DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

-कृपया प्रसिध्दीसाठी -

# डोंबिवली नागरी सहकारी बँकेस बहुराज्यीय बँकेचा दर्जा प्राप्त –

**''डोंबिवली नागरी सहकारी बँकेस नुकताच मा. सेंट्रल रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्हज यांचेकडून मल्टी स्टेट शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला आहे. यापुढे बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यासोबत अन्य राज्यातही असणार आहे. सुरुवातीस मध्यप्रदेशमधे शाखा विस्तार करण्याचा बँकेचा मानस आहे. डोंबिवली बँक परिवारासाठी ही आनंददायी व अभिमानास्पद घटना आहे" असे बँकेचे मा. अध्यक्ष श्री. उदय कर्वे यांनी सांगितले.**

- ## आर्थिक वर्ष २०१६-१७ –

२०१६-१७ या आर्थिक वर्षात आपल्या बँकेने समाधानकारक कामगिरी बजावली आहे. या वर्षात बँकेच्या **ठेवी ११ % नी वाढून ₹ ४,३७४/- कोटी** झाल्या तर **कर्जव्यवहार १० % नी वाढून ₹ ३,२४३/- कोटींवर** पोहोचला आहे. **एकूण व्यवसाय ₹७,६००/- कोटी झाला आहे. भाग-भांडवलात भरीव वाढ झाली असून, आर्थिक वर्ष अखेरीस बँकेचे भाग-भांडवल ₹ १३०/- कोटींहून अधिक** झाले आहे. बँकेच्या निव्वळ नफ्यात वाढ होऊन तो **₹ ३८/- कोटी** झाला आहे. बँकेस मागील सर्व वर्षांप्रमाणे याही वर्षी ऑडिटमधील **''अ"** वर्ग प्राप्त झाला आहे. कर्जे, ठेवी, भाग-भांडवल इत्यादी आघाड्यांवर चांगली कामगिरी करत असतांनाच बँकेने ह्या वर्षात भरीव कर्ज वसुलीसुध्दा केली आहे.
बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. २३ जुलै, २०१७ रोजी डोंबिवली येथे संपन्न झाली. सदर सभेत भागधारकांना **१२ % लाभांश** मंजूर करण्यात आला.

- ## शाखा विस्तार –

मागील आर्थिक वर्षात बँकेने शहाड, माणगांव, कुडाळ, रत्नागिरी, विक्रमगड, सिंहगड रोड, संगमनेर व कल्याण शीळ रोड या ८ नवीन शाखांचा शुभारंभ केला. आज रोजी बँकेच्या महाराष्ट्रात १५ जिल्ह्यात ५७ शाखा कार्यान्वित आहेत. काल्हेर (भिवंडी), बोळींज (विरार) व रांजणोली (कल्याण-भिवंडी रस्ता) येथेही लवकरच शाखा सुरू होतील.

भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकेस **नविन ठिकाणी शाखा विस्तार** करण्यास अनुमती दिली आहे. पुढील वर्षभरात महाड, दापोली, बावधन (पुणे), मारुंजी (पुण्याजवळ), इस्लामपूर (जि.सांगली), कामोठे (नवी मुंबई), आधारवाडी (कल्याण), खोणी (तळोजा एमआयडीसी रोड) व कल्याण - ठाकुर्ली रोड या ठिकाणी शाखा सुरु करण्यात येतील.

**या सर्वांगीण प्रगतीत डोंबिवली बँकेतील सर्व कर्मचारी व अधिकारी वर्ग, व्यवस्थापकीय वर्ग, संचालक मंडळ तसेच खातेदार, भागधारक व बँकेचे हितचिंतक या सर्वांचाच खूप महत्त्वाचा वाटा आहे.**

-0-0-0-